**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुनिलकुमार बावधनकर
चोपडे एजन्सीज ॲन्ड कनसल्टसीज, हिरामण लांडे बिल्डिंग,
मुंबई-पुणे रोड, कासारवाडी, पुणे-३४ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
माण, ता.माण, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा एकात्मिक बालविकास अधिकारी,
एकात्मिक बालविकास योजना, माण, ता.माण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५८ / सातारा / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुनिलकुमार बावधनकर
चोपडे एजन्सीज ॲन्ड कन्सल्टन्सीज, हिरामण लांडे बिल्डिंग,
मुंबई-पुणे रोड, कासारवाडी, पुणे-३४

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
माण, ता.माण, जि.सातारा श्री.व्ही.पी.जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा एकात्मिक बालविकास अधिकारी,
एकात्मिक बालविकास योजना, माण, ता.माण, जि.सातारा श्री.गोरख दाजीराम शेलार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.६.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.७.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन १९९६ ते २००७ या कालावधीतील एकात्मिक बालविकास अधिकारी, माण यांच्या प्रतिवर्षी फेब्रुवारी, मार्च, एप्रिल महिन्याच्या शासकीय दैनंदिनीच्या छायांकित प्रती, वरील कालावधीत एकात्मिक बालविकास कार्यक्रमास शासनाकडून आलेल्या व वितरीत झालेल्या शिशुआहार, अनुदान, मदतीचा शासकीय ताळेबंद तपशिलाच्या छायांकित प्रती | |

## विवेचन

एकात्मिक बालविकास कार्यक्रमाच्या संदर्भातील सन १९९६ ते २००७ या काळातील ताळेबंदासह विविध स्वरुपाची माहिती अपीलकर्ता श्री.सुनिलकुमार बावधनकर यांनी जन माहिती अधिकारी तथा एकात्मिक बालविकास अधिकारी, एकात्मिक बालविकास योजना, माण, जि.सातारा यांच्याकडे मागितली होती. त्यांनी दिलेली माहिती अपुरी व अधिकृत नसल्याचा आक्षेप घेऊन श्री.बावधनकर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, माण, ता.माण, जि.सातारा यांच्याकडे अपील केले. मूळ दस्तऐवजानुसार दिलेली माहिती बरोबर असल्याचा निष्कर्ष काढून अपिलीय प्राधिकारी श्री.व्हि.पी.जाधव यांनी अपील निकाली काढले. आपल्याला योग्य माहिती मिळाली नाही, खोटी माहिती देऊन आपली व शासनाची फसवणूक केली, अशा कारणावरुन श्री.बावधनकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि. २३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्यामुळे सदरचे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

श्री.बावधनकर यांनी विहित मुदतीत माहिती देण्यात आली, अपिलाचा निर्णयही विहित मुदतीत देण्यात आला, तसेच मूळ दस्तऐवजाची पडताळणी केली असता दिलेली माहिती खरी

असल्याचे आढळून आले. मूळ अर्जात छायांकित प्रतीची मागणी अपीलकर्त्याने केली होती, प्रमाणित प्रतींची मागणी केलेली नव्हती. परंतु त्यांच्या मागणीप्रमाणे माहिती प्रमाणित करुन देण्याचे आदेश दिल्यानंतरही ठरल्याप्रमाणे माहिती प्रमाणित करुन घेण्यासाठी ते आले नाहीत, असे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, माण श्री.व्ही.पी.जाधव व जन माहिती अधिकारी तथा एकात्मिक बालविकास अधिकारी, माण श्री.गो.दा.शेलार यांनी प्रपत्रात नमूद केले. संबंधित प्रकरणात फार मोठा भ्रष्टाचार झाला असून जन माहिती अधिकाऱ्यांनी अपूर्ण व खोटी माहिती दिली असून अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यांना मदत केली आहे, असा आरोप श्री.बावधनकर यांनी प्रपत्रात व अन्य कागदपत्रांमध्ये केला आहे.

आपल्याला देण्यात आलेल्या ताळेबंदातील सन १९९५-९६ चे ताळेबंद अधिकृत आहेत. त्यानंतरच्या ताळेबंदांवर लेखाधिकारी यांचा शेरा नाही, त्यामुळे ते अधिकृत नाहीत. तत्कालीन एकात्मिक बालविकास अधिकारी, माण यांच्या दैनंदिनीच्या सन १९९६-२००० या काळातील प्रती दिलेल्या नाहीत. तसेच गाडीचे लॉगबुक व प्रवास यांत ताळमेळ नसून ते व घेतलेले भत्ते कायदेशीर नाहीत. एका संस्थेशी करार करुन माल अन्य संस्थेकडून खरेदी करुन संस्थेची फसवणूक केली, असे मुद्दे श्री.बावधनकर यांनी लेखी निवेदनांप्रमाणेच आयोगापुढील सुनावणीतही मांडले, आपल्याला माहिती खोटी वाटते, असे प्रतिपादन त्यांनी केले. मात्र ते सिध्द करणारे पुरावे ते देऊ शकलेले नाहीत. कृती बेकायदेशीर असल्यामुळे माहिती खोटी मानावी, हे त्यांचे प्रतिपादन ग्राह्य मानता येणार नाही.

सन १९९६-९७ ते मार्च-२००१ अखेरच्या दैनंदिनीचे कागदपत्र जतनाच्या वर्गीकरणानुसार नाश करण्यात आले असून त्यानंतरच्या दैनंदिनीच्या छायांकित प्रती दिल्या आहेत. १९९५-९६ चेच लेखा परीक्षण झालेले होते, त्यामुळे लेखा परीक्षण अहवालाची प्रत दिली. सन १९९६-९७ ते २००७ अखेरचे लेखा परीक्षण झाले नव्हते, त्यामुळे अनुदान व खर्चाच्या विवरणपत्राच्या मूळ दस्तऐवजावरुन छायांकित प्रती दिल्या. आता चालू वर्षापर्यंतचे लेखापरीक्षण झाले असून त्याच्या प्रती देणे शक्य आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.गोरख दाजीराम शेलार यांनी नमूद केले.

दैनंदिनी नाश केल्याच्या संदर्भातील नाशनस्त्यांची नोंदवही त्यांनी सादर केली. जन माहिती अधिकाऱ्यांच्या निवेदनाला अपिलीय प्राधिकारी यांनी दुजोरा दिला.

प्रवासाच्या नोंदी नियमबाह्य आहेत, भत्ते चुकीचे घेतले आहेत, भ्रष्टाचार झाला आहे, हे श्री.बावधनकर यांचे मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाहीत. या तक्रारींच्या संदर्भात संबंधित नियमावलीनुसार प्रशासकीय वा न्यायालयीन मार्गाने दाद मागण्याचा मार्ग अपीलकर्त्याला उपलब्ध आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अमान्य.

(२) माहिती मागितली तेव्हाच्या विवरणपत्राच्या प्रती व नंतर पूर्ण झालेल्या लेखापरीक्षण अहवालाच्या प्रती प्रमाणित असल्याचे पत्र (संबंधित कागदपत्रांच्या उल्लेखासह) अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी तथा एकात्मिक बाल विकास अधिकारी यांनी द्यावे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.४.३.२००९

३३-३६

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.आ.स.जाधव
३९, शनिवार पेठ, एस.टी.स्टँडसमोर, कराड, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४१२-इ, शिवाजीनगर, पुणे-१६ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४१२-इ, शिवाजीनगर, पुणे-१६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६०+४६५ / सातारा /२००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.आ.स.जाधव
३९, शनिवार पेठ, एस.टी.स्टँडसमोर, कराड, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४१२-इ, शिवाजीनगर, पुणे-१६ श्री.गो.पं.चौधरी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४१२-इ, शिवाजीनगर, पुणे-१६ श्री.भि.द.मिसाळ

<table>
<tr><td>४</td><td>जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख</td><td>दि.१०.६.२००८</td></tr>
<tr><td>५</td><td>जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख</td><td>दि. १०.७.२००८</td></tr>
<tr><td>६</td><td>प्रथम अपिलाची तारीख</td><td>दि.२२.७.२००८</td></tr>
<tr><td>७</td><td>अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख</td><td>दि. १.८.२००८</td></tr>
<tr><td>८</td><td colspan="2"><u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u><br><br><u>अपील क्र.४६०</u><br>सहसंचालक, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जातीजमाती आयोग, मुंबई यांना प्र.सहसंचालक यांनी पाठविलेल्या छाननी अहवालातील पान क्र.५ वर नमूद केलेली, प्राचार्य मानकर यांच्या दि.३०.३.१९९४ रोजीचे निवेदनाची छायांकित सत्यप्रत.<br><br><u>अपील क्र.४६५</u><br>सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४१२-इ, शिवाजीनगर, पुणे-१६ यांनी सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) यांना दि.२०.१०.२००४ रोजी क्र.५२४ ने पाठविलेल्या पत्रासोबत माझे वर्तणुकीबाबत जोडलेल्या ३९ छायापत्रांच्या छायांकित सत्यप्रती</td></tr>
</table>

## <u>विवेचन</u>

आपल्या वर्तणुकीच्या संदर्भातील ३९ पत्रांच्या छायांकित सत्यप्रती, तसेच अन्य दोन मुद्दयां बाबतची माहिती अपीलकर्ता श्री.आ.स.जाधव यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४१२-इ, शिवाजीनगर, पुणे-१६ यांच्याकडे केली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर ही माहिती न मिळाल्यामुळे श्री.जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

राज्य माहिती आयोगाने दि. २३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या दोन्ही अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्यामुळे सदरचे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

श्री.जाधव हे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथे आरेखक म्हणून सेवेत होते. त्यांच्या बदली व अन्य कारवाईच्या अनुषंगाने विविध पातळ्यांवर ते अर्ज व तक्रारी करीत आले आहेत. आपण मागितलेल्या ३९ प्रतींबाबतही एकच पत्र दिले, बाकीच्या ३८ पत्रांच्या प्रती अयोग्य प्रकारे तयार करुन आपली बदली करण्यात आलेली आहे, अशी तक्रार श्री.जाधव यांनी लेखी व तोंडी केली.

श्री.जाधव यांनी यापूर्वी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश २००३ नुसार अर्ज व अपील केले होते, त्यावेळीही त्यांना माहिती देण्यात आली. त्याच माहितीसाठी दि.१२.२.२००८ रोजी ३९ मूळ प्रती दाखविण्याची मागणी त्यांनी केली. ती कागदपत्रे त्यांना दाखविण्यात आली. त्याच्या प्रती स्वीकारण्यास त्यांनी नकार दिला. श्री.जाधव मूळ प्रतींच्या प्रतीची मागणी करीत आहेत. परंतु ही कागदपत्रे सुमारे १३ वर्षांपूर्वीची आहेत. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड यांच्याकडून या पत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध झालेल्या आहेत. सन १९८७ पासून श्री.जाधव यांना त्यांच्या वर्तणुकीतील दोषांबाबत दिलेली समज विभागीय पत्रे, ज्ञापने अशी ही कागदपत्रे असून कराडच्या महाविद्यालयाकडून आलेल्या छायांकित प्रतीच आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध आहेत. यातील २८ छायांकित प्रती या महाविद्यालयाकडून आलेल्या असून बाकीच्या प्रती श्री.जाधव यांच्या सहीच्या आहेत, म्हणून दिल्या नाहीत. मूळ प्रती आपल्या कार्यालयाकडे नसल्यामुळे साक्षांकित करुन देणे शक्य नाही, असे जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४१२-इ, शिवाजीनगर, पुणे श्री.भि.द.मिसाळ व अपिलीय प्राधिकारी तथा प्र.सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४१२-इ, शिवाजीनगर, पुणे श्री.गो.पं.चौधरी यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. श्री.जाधव यांनी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती व जमाती, मुंबई, सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) पुणे विभाग, पुणे यांच्यासह विविध पातळ्यांवर तक्रारी व फौजदारी खटला दाखल करण्याच्या मागणीसह विविध स्वरुपाचा पत्रव्यवहार केला आहे. उभय बाजूंनी त्यांच्या प्रती सादर केल्या. श्री.जाधव यांच्या तक्रारीत तथ्य नसल्याचा निर्णय सहाय्यक आयुक्त, (मागासवर्गीय कक्ष)

विभागीय आयुक्त कार्यालय, विधानभवन, पुणे यांनी दि.५.११.२००४ रोजी दिल्याचेही त्या कागदपत्रात नमूद आहे.

तत्कालीन प्राचार्य जी.सी.मानकर यांनी दि.३०.३.१९९४ रोजी उपसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, शिवाजीनगर, पुणे यांना सादर केलेल्या निवेदनाची सत्यप्रत गोपनीयतेच्या कारणाखाली जन माहिती अधिकाऱ्यांनी नाकारली व अपिलीय प्राधिकारी यांनी तो निर्णय कायम केला.

मूळ कागदपत्रे आपल्या कार्यालयाकडे नसल्यामुळे छायांकित प्रतीवरुन छायांकित प्रती दिल्या असल्याने सत्यप्रत म्हणून साक्षांकन करता येत नसल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे ग्राह्य धरण्यात येत आहे. देऊ केलेली कागदपत्रे स्वीकारण्याबाबत अपीलकर्त्याने दिलेला नकार व आपल्याला हवी तशीच कागदपत्रे मिळण्याचा आग्रह पत्रव्यवहारातून स्पष्ट होतो. आपल्या वर्तणुकीबद्दल केलेली कारवाई अयोग्य असल्याचा श्री.जाधव यांचा मुख्य आक्षेप आहे. तशा स्वरुपाची नोंद त्यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात व अन्य कागदपत्रात केली आहे. ही बाब माहितीच्या अधिकाराच्या कक्षेतील नाही.

प्राचार्य मानकर यांच्या पत्राची सत्यप्रत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८(छ) खाली (जी प्रकट केल्याने कोणत्याही व्यक्तीच्या जीवितास किंवा शारीरिक सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अथवा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षा प्रयोजनासाठी विश्वासपूर्वक दिलेल्या माहितीचा स्त्रोत किंवा केलेले सहाय्य ओळखता येईल, अशी माहिती,) जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी नाकारली आहे. संबंधित पत्रातील आशय लक्षात घेता ते पत्र अपीलकर्त्यास द्यावे की नाही याबाबत त्यांना वाटणारी साशंकता या उत्तरातून दिसून येते. मात्र उपसंचालकांना लिहिलेले व श्री.जाधव यांच्या संदर्भातील आक्षेप नोंदविणारे हे पत्र असल्यामुळे त्याची प्रत श्री.जाधव यांना देणे योग्य ठरेल. तसेच छायांकित प्रतीवरुन छायांकित प्रती दिल्या असल्याचे पत्र देणे पुरेसे ठरेल. प्रत्येक प्रत साक्षांकित करुन देण्याची आवश्यकता नाही.

छायांकित प्रतीवरुन प्रती दिल्या असल्याचे पत्र जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४१२-इ, शिवाजीनगर, पुणे यांनी अपीलकर्त्यांस द्यावी व प्राचार्य श्री.मानकर यांच्या पत्राचीही प्रत अपीलकर्त्यांस देण्यात यावी असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला होता. त्याप्रमाणे अपिलीय प्राधिकारी तथा प्र.सहसंचलाक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४१२-इ, शिवाजीनगर, पुणे यांनी कार्यवाही करुन त्याचा अहवाल दि.२०.२.२००९ रोजी आयोगाला सादर केलेला आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१३.३.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सत्यनारायण हणमंत शेडगे
मु.पो.शेंद्रे, ता.जि.सातारा — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, युगपुरुष शिवाजी शिक्षण संस्था,
द्वारा राजमाता सुमित्राराजे भोसले विद्यालय, मु.पो.शेंद्रे, ता.जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यवाह, युगपुरुष शिवाजी शिक्षण संस्था,
द्वारा राजमाता सुमित्राराजे भोसले विद्यालय, मु.पो.शेंद्रे, ता.जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६१ / सातारा / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सत्यनारायण हणमंत शेडगे
मु.पो.शेंद्रे, ता.जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, युगपुरुष शिवाजी शिक्षण संस्था,
द्वारा राजमाता सुमित्राराजे भोसले विद्यालय, मु.पो.शेंद्रे, ता.जि.सातारा
श्री.एकनाथराव तात्यासाहेब बर्गे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यवाह, युगपुरुष शिवाजी शिक्षण संस्था,
द्वारा राजमाता सुमित्राराजे भोसले विद्यालय, मु.पो.शेंद्रे, ता.जि.सातारा
श्री.शामराव अण्णा मोहिते

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>युगपुरुष शिवाजी शिक्षण संस्था या संस्थेबाबत- दि.२६.७.२००७चे अर्जाप्रमाणे संस्थेचे पत्र क्र.निरंक, दि.४.८.२००७ प्रमाणे मागितलेली माहिती, शासनाने मंजूर केलेल्या अनुदानाचा व सेवक वर्गाचा तपशील, मिळालेल्या देणग्या, इमारत बांधणी वगैरेसाठी मंजूर केलेले आराखडे व नियोजित खर्च, एप्रिल २००३ सालापासून ताळेबंद, नफातोटा पत्रक व ऑडिट रिपोर्ट (एकूण ५ वर्षांचे), तीन शाखांमध्ये नवीन इमारत बांधकाम, प्रयोगशाळा व लायब्ररीसाठी केलेला खर्च, घटनेचा दुरुस्ती अहवाल, कार्यवाह या पदावर कोणास नियुक्त केले त्याचा संस्थेचा ठराव व नियुक्ती पत्र, रु.१००००/- पेक्षा जास्त देणगी देणाऱ्या देणगीदारांची नावे व तारीख. (एप्रिल २००३ ते मार्च २००७). |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता श्री.सत्यनारायण हणमंत शेडगे यांनी युगपुरुष शिवाजी शिक्षण संस्थेच्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यवाह, युगपुरुष शिवाजी शिक्षण संस्था, द्वारा राजमाता सुमित्राराजे भोसले विद्यालय, मु.पो.शेंद्रे, ता.जि.सातारा यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी काही माहिती दिली व अन्य माहिती विस्तृत असल्यामुळे तयार करण्याचे काम सुरु असल्याचे कळविले. त्याविरुध्द श्री.शेडगे यांनी सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सातारा विभाग, सातारा यांच्याकडे अपील केले. परंतु संस्थेच्या अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील करणे आवश्यक असल्याचे त्यांनी कळविले. त्यानंतर श्री.शेडगे यांनी प्रथम अपील न करता राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश दि. २३.१०.२००८ रोजी करण्यात आला होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्यामुळे सदरचे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले. आपण मागितलेली माहिती अपूर्ण देण्यात आली असून एक वर्षाचा विलंब झाला आहे, त्यामुळे शास्ती करावी व पूर्ण माहिती देण्याचा आदेश व्हावा, अशी मागणी श्री.शेडगे यांनी प्रपत्रात नोंदविली.

श्री.शेडगे विविध प्रकारची माहिती सातत्याने मागत असून वेगवेगळ्या पत्रांद्वारे मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त माहितीची मागणी करीत आले आहेत, असे जन माहिती अधिकारी श्री.शामराव अण्णा मोहिते व अपिलीय प्राधिकारी श्री.एकनाथराव तात्यासाहेब बर्गे यांनी श्री.शेडगे यांच्या संबंधित पत्रांच्या प्रतींसह नमूद केले. संस्थेत सभासद करुन घेण्याबाबतच्या विषयातून श्री.शेडगे असंतुष्ट असून त्रास देण्यासाठी अशा प्रकारचे अर्ज करीत आहेत, असे प्रतिपादन त्यांनी केले. संस्थेचे माजी सचिव श्री.एन.वाय.पवार यांच्या सहीने अशाच प्रकारची माहिती मागणारा अर्ज त्यांनी केला असून माहिती मात्र श्री.शेडगे यांच्या पत्त्यावरच मागितली आहे, असे नमूद करुन त्या अर्जाची प्रतही त्यांनी सादर केली.

श्री.शेडगे यांनी माहिती मागणीच्या मूळ अर्जानंतर अन्य पत्रव्यवहार करुन अतिरिक्त माहिती मागितल्याचे कागदपत्रांवरुन स्पष्ट दिसते. जन माहिती अधिकाऱ्यांनी त्या त्या वेळी माहिती दिली आहे. अन्य व्यक्तीच्या नावे माहिती मागण्याचा प्रयत्नही दिसतो. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अभिप्रेत असलेल्या पारदर्शकतेचया व निकोपतेच्या तत्त्वाशी हे सुसंगत नाही. शास्ती व अन्य कार्यवाहीची अपीलकर्त्याची मागणी अमानय करण्यात येत आहे. मागितलेल्या माहितीचे प्रमाण लक्षात घेता अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखाचे निरीक्षण करता येईल.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २.३.२००९**
१७-१९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सयाजीराव परशुराम झोडगे
मु.पो.मायणी, ता.खटाव, जि.सातारा

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६४ / सातारा / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सयाजीराव परशुराम झोडगे
मु.पो.मायणी, ता.खटाव, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा प्रतिनिधी श्री.एस.एस.शेटे

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून (अपील शाखा),
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.एस.एस.शेटे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.१०.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>क्र.आरटीएस/रिव्ही/३/२००७ मध्ये दि.१०.९.२००७ रोजी दिलेला निर्णय रद्द केला त्याचया छायांकित प्रती व कोणत्या ॲक्टखाली रद्द केला याची माहिती. | |

## विवेचन

आरटीएस प्रकरणात दिलेला निर्णय रद्द करण्याच्या कारणांची माहिती अपीलकर्ता श्री. सयाजीराव परशराम झोडगे यांनी जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून (अपील शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांच्याकडे मागितली होती. संबंधित निकालपत्रात याबाबतचा उहापोह केला असल्यामुळे निकालपत्राची छायांकित प्रत देण्यासाठी शुल्क भरण्यास जन माहिती अधिकारी यांनी कळविले. तयाविरुध्दचे अपील अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा यांनी फेटाळले. त्याविरुध्द श्री.झोडगे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.२३.१०.२००८ रोजी झालेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. अपीलकर्ता यांनी 'भारतीय वारस हक्कानुसार मला माझी वडिलार्जित जमीन मिळाल्याशिवाय अपील निकाली काढू नये,' असे नमूद केले. उभय बाजूंचे एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

संबंधित जमीन वारसा हक्काने आपली असून, आपल्या चुलत्यांनी वारसांना विचारात न घेता बेकायदेशीर दस्त करुन विकली. उपविभागीय अधिकारी, फलटण उपविभाग, फलटण, जि.सातारा यांच्याकडे झालेल्या अपिलात त्यांनी आपल्या बाजूने निर्णय दिला. परंतु अप्पर जिल्हाधिकारी, सातारा यांनी अपिलात आपल्या विरुध्द निर्णय देऊन तो फेरफार रद्द केला. याबाबत

आपण सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणही केले होते असे प्रतिपादन श्री.सयाजीराव झोडगे यांनी केले. न्यायालयीन स्वरुपाच्या कामकाजातील निर्णय तसे का दिले, याची विचारणा श्री.झोडगे यांनी केली असून संबंधित निकालपत्रात ती स्पष्ट केलेली आहे. शुल्क भरुन ती प्रत त्यांनी घ्यावयास हवी होती. त्यांनी शुल्क भरले नाही, तसेच आवश्यक असल्यास प्रचलित नियमानुसार प्रशासकीय / न्यायालयीन मार्गाने ते दाद मागू शकतात असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.एस.एस.शेटे यांनी नमूद केले.

खुलाशाची, तसेच जमीन आपल्याला मिळण्याची अपीलकर्त्यांची मागणी असल्याचे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रासह सर्व कागदपत्रांमध्ये नमूद केले आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही.

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि. २ .३.२००९**

मार्च-९-११

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संपतराव ल.सावंत
फिनिक्स, ५३/५अ, शिवाजीनगर, संगमनगर, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा
जिल्हा सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी(प्रांत),
जिल्हा सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६६ / सातारा / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संपतराव ल.सावंत
फिनिक्स, ५३/५अ, शिवाजीनगर, संगमनगर, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा
जिल्हा सातारा, प्रतिनिधी श्री.एम.एन.भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी(प्रांत),
जिल्हा सातारा, प्रतिनिधी श्री.व्ही.आर.धायगुडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.९.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.१०.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>मौजे लिंब, ता.सातारा येथील स.नं.८४८/३ या जमिनीला दिलेल्या बिनशेती आदेश व १.अट नं.५ मधील बांधकाम नियमावली २.अट क्र.७ मधील १२.८८X१०.६१ बांधकाम वाणिज्य विषयासाठी वापरत असलेचा पुरावा ३.अर्जदाराने तांत्रिक नियमाचे पालन करताना गुंठेवारी विकास अध्यादेश २००१ क्र.अ.न.वा १०२०/४८०/प्रक्र ७९/भाग/२/नवि-२० याची नक्कल, ४.रेखांकनाचे आखणीनुसार तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांनी प्रमाणित केल्याप्रमाणे अंतिम मंजुरी ५.राष्ट्रीय महामार्गाचे १५ मी. कोणत्या बाजूस आहे याचा दाखला व त्याप्रमाणे मंजूर सुधारीत आराखडा ६.सक्षम अधिका-यांकडून इमारत आराखडा मंजूर करुन घेतलेला दाखला ७.बांधकाम आराखडा सहाय्यक संचालक यांच्याकडून मंजूर केलेला दाखला ८.राष्ट्रीय महामार्ग क्र.४ चा ना हरकत दाखला ९.ग्रामपंचायत, लिंब यांचा बांधकाम परवाना नक्कल. | |

## विवेचन

मौजे लिंब येथील स.नं.८४८/३ संदर्भात मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सातारा यांनी वेळेत दिली नाही व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा यांनी अपील नाकारले, म्हणून अपीलकर्ता श्री.संपतराव ल.सावंत यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि. २३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्यामुळे सदरचे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणीच्या दिवशी मा.राष्ट्रपती, भारत सरकार यांचा दौरा असल्यामुळे अनुपस्थित राहण्याची परवानगी मागितली होती, ती मान्य करण्यात येत आहे.

श्री.सावंत यांनी गुंठेवारीच्या संदर्भात माहिती मागितली होती. बिनशेतीची उपलब्ध माहिती दिली आहे, संबंधित संचिका उपलब्ध होत नसल्यामुळे अभिलेखात शोध घेण्याचे काम चालू होते. त्यामुळे माहिती देण्यास उशीर झाला. संचिका सापडल्यानंतर श्री.सावंत यांना त्वरित कळविले. काही कागदपत्रे (उदा.रेखांकनाची अंतिम मंजुरी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचा 'ना हरकत' दाखला इ. ) आपल्या कार्यालयातील अभिलेखात उपलब्ध नसल्यामुळे देता येत नसल्याचे त्यांना कळविले व त्यांनी ते मान्य केले, असे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सातारा यांचे प्रतिनिधी श्री.व्ही.आर.धायगुडे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. श्री.सावंत यांनी केलेल्या अपिलात ते कोणाविरुध्द आहे हे लिहिलेले नाही, तसेच संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांच्या आदेशाची प्रतही जोडलेली नव्हती, त्यामुळे त्यांचे अपील निकाली काढण्यात आले वा तसे त्यांना कळविण्यात आले, असे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सातारा यांचे प्रतिनिधी श्री.एल.जे.बोबडे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले.

श्री.सावंत यांनी या संदर्भातील सर्व अर्ज मागे घेतल्याचे लिहून दिलेले असल्याचे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सातारा यांचे प्रतिनिधी श्री.व्ही.आर.धायगुडे यांनी नमूद केले. आपण मूळ प्रकरणातील अर्ज मागे घेतले असून माहितीच्या अधिकारातील अर्ज मागे घेतलेले नाहीत, असे श्री.सावंत यांनी सांगितले. मात्र श्री.सावंत यांनी दि.३.११.२००८ रोजी दिलेल्या निवेदनात अन्य अर्जांबरोबरच माहितीच्या अधिकारातील अर्जांचाही उल्लेख केला असून सर्व अर्ज मागे घेत असल्याचे म्हटले आहे.

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सातारा यांनी अपिलाचा नेमका शोध कशा प्रकारे घेतला, ते कधी उपलब्ध झाले व अपीलकर्त्यास कधी कळवले याचा खुलासा केलेला नाही, तसेच अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा श्री.रमेश चव्हाण यांनी ४५ दिवसाच्या विहित मुदतीत अपिलाचा निर्णय दिलेला नाही. दोघांचेही मूळ माहितीबाबतचे स्पष्टीकरण मान्य करण्यात येत असले तरी त्यांनी विलंबाबाबत खुलासा त्वरित सादर करणे आवश्यक आहे.

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) अभिलेखाच्या शोधाबाबत जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सातारा श्री.संजय शिंदे यांनी व प्रथम अपिलाच्या निर्णयाला लागलेल्या विलंबाबाबत अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा श्री.रमेश चव्हाण यांनी दि.१५.३.२००९ पर्यंत लेखी खुलासा आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.६.३.२००९**